MHSO170035582025

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७५/२०२५ मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश

(आदित्य राजेंद्र गाडेकर व इतर वि. निरंक)

१. अर्जदार क्र. १ ते ४ यांनी स्वतःच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मंजूर होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदारांचे संक्षिप्त कथन असे की, अर्जदार क्र. १ ते ३ अनुक्रमे नामे श्री. आदित्य राजेंद्र गाडेकर, श्री. सौरभ राजेंद्र गाडेकर आणि सौ. सोनाली संदीप राऊत यांचे चुलते तर अर्जदार क्र.४ नामे श्री. अरुण किसन गाडेकर यांचा मुलगा नामे बाळासाहेब अरुण गाडेकर यांचे दि.०६.०१.२०२४ रोजी सोलापूर येथे निधन झालेले आहे. अर्जदारांचे पुढे असेही कथन की, अर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार क्र.१ यांचा भाऊ व बहीण असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयत यांचे अनुक्रमे पुतण्या–पुतणी आहेत. अर्जदारांचे पुढे असेही कथन आहे की, मृत बाळासाहेब अरुण गाडेकर हे अविवाहीत होते. प्रस्तुत अर्जदारांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत.

३. अर्जदारांचे पुढे असेही कथन की, मयत बाळासाहेब अरुण गाडेकर हे ग्रामपंचायत, भोसरे येथे लिपीक या पदावर नोकरीस होते. मृत बाळासाहेब अरुण गाडेकर यांच्या मृत्यु पश्चात अनुकंपाखाली त्यांचे जागेवर नोकरीस घेण्यासाठी आणि रक्कम मिळण्यासाठी अर्जदारांना वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता अर्जदार हे संबंधित कार्यालयामध्ये गेले असता त्यांना सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र आणण्याचे सूचित करण्यात आले. सबब, प्रस्तुत अर्ज.

४. अर्जदार क्र.१ व ४ यांनी अर्जातील कथनांच्या सत्यतेसाठी त्यांचे साक्षीपुराव्याचे शपथपत्र अनुक्रमे नि.क्र.१८ व २९ वर दाखल करून अर्जातील मजकुराचा पूनःउल्लेख केला आहे. तसेच उपरोक्त मागणी केल्याप्रमाणे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्याबाबत शपथेवर कथन केलेले आहे. अर्जदारांनी नि.क्र.४ सोबत बाळासाहेब अरुण गाडेकर यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल करून त्यानंतर त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

५. अर्जदारांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र दै. 'तरुण भारत' या दिनांक २९.०१.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. मात्र मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

६. उपरोक्त कागदपत्रांच्या अनुषंगाने असे स्पष्ट होते की, बाळासाहेब अरुण गाडेकर हे अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या तारखेस मयत झाले आहेत; तसेच त्यांनी मृत्यूपत्र केलेले नाही. असे देखील स्पष्ट होते की, जाहीर प्रगटन दिल्यानंतर मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. येथे असे नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जदारांनी उपरोक्त सर्व बाबी शपथेवर कथन केलेल्या आहेत, त्यामुळे त्यांच्या कथनांवर अविश्वास दाखविण्यासारखी कोणतीही परिस्थिती न्यायालयासमोर नाही. तसेच प्रस्तुत अर्ज हा केवळ अर्जदार हे मयत बाळासाहेब अरुण गाडेकर यांचे वारसदार असल्याचे औपचारीकपणे मान्य करण्याकरिता दाखल असल्यामुळे अर्जदारांची गरज लक्षात घेवून त्यांना तसे औपचारिकपणे वारस मान्य करणे गरजेचे आहे. सबब, अर्जदारांच्या नावे ते मयत बाळासाहेब अरुण गाडेकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायाचे होईल. अंततः खालील आदेश पारीत करण्यात येत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत बाळासाहेब अरुण गाडेकर यांचे कायदेशीर वारस आहेत.

३. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत बाळासाहेब अरुण गाडेकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे विहित नमुन्यातील वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) हे अर्जदारांनी आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

४. मुंबई नियमन ८, १८२७ चे कलम ७ प्रमाणे तसेच दिवाणी नियमावलीचा परिच्छेद क्र.३१२ प्रमाणे प्रस्तुत प्रमाणपत्रावर तशी टीप नमूद करावी.

BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.08.05 16:19:57 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)
३रे सह–दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
माढा.

दिनांक : ०५.०८.२०२६.
ठिकाण : माढा, जि. सोलापूर.